

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकीटे लावून पोस्टाने पाठविण्याचा परवाना -Regd. NSK / 231 / 2018-2020
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.

किंमत १ रुपया

अग्रतश्चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु: ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ४० वे | अंक १० वा | १० ऑक्टोबर २०१९



संस्थेच्या वर्धापन दिनी श्री गणेशाची आरती करताना श्री. दिलीप फडके, कार्यकारी मंडळ सदस्य व श्रोते

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिकचा गुणगौरव समारंभ (वर्धापन दिन)

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक च्या अनेक योजना आणि उपक्रम आहेत. त्यापैकी एक महत्वाची योजना म्हणजे 'गुणवंतांचा गौरव' – गुणगौरव समारंभ!

शालान्त परीक्षा, महाविद्यालयीन परीक्षा, स्पर्धा परीक्षा ह्यात उत्तम यश संपादन करणाऱ्या आपल्या सदस्यांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचा आपण गुणगौरव करत असतो. अनेक दानवीर व्यक्तींनी दिलेल्या ठेवींच्या माध्यमातून आपण ह्या शिष्यवृत्ती, पुरस्कार देतो आणि विशेष म्हणजे फक्त शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर, क्रिडा, सांस्कृतिक, इतर अन्य क्षेत्रात देखील काही खास, राज्य पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील संस्था सत्कार करते व त्यांना प्रोत्साहन देते. या वर्षी सुद्धा सुमारे विद्यार्थ्यांचा गुरुवार दि. ५ सप्टेंबर रोजी गुणगौरव करण्यात आला. ह्या दिवशी संस्थेचा वर्धापन दिन असतो.

असं म्हणतात, 'मनुष्य आयुष्यभर विद्यार्थी असतो अर्थात त्याने तसे असावे, आणि म्हणूनच विविध क्षेत्रात उच्च पदे भूषविणाऱ्या, निवडून आलेल्या आपल्या मान्यवर सदस्यांचा देखील संस्था सत्कार करते. जे इतरांसमोर आदर्श असतात. यावेळी संस्थेतर्फे खालील सत्कार करण्यात आले.

✻ **श्री. अविनाश जी भिडे :–**

महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड .

✻ **श्री. प्रा. दिलीप फडके:–**

महाराष्ट्र सरकारच्या 'महारेगा' च्या नाशिक विभागाच्या, समुपदेशक पदी निवड .

✻ **श्री. मोहन रानडे :–**

महाराष्ट्र सरकारच्या 'महारेगा'च्या नाशिक विभागाच्या समुपदेशक पदी निवड .

✻ **श्री. जयंत भाभे :–**

महाराष्ट्र व्होकेशनल टीचर्स असोसिएशनच्या राज्यव्यापी संघटनेवर बिनविरोध निवड .

संस्थेचे विश्वस्त श्री. मधुकर बापट ह्यांच्या हस्ते गुणवंताचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने, सचिव श्री. अभय खरे, कार्यकारिणीचे सदस्य या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. अल्पोपहार झाल्यावर कार्यक्रम संपला.

**विशेष सर्वसाधारण सभा :–**

शनिवार, दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक यांची वार्षिक सर्वसाधारण सभा, काका गद्रे सभागृहात झाली. संकेतानुसार इतर विषय, वृत्तांत व चर्चा झाली. इतर विषयांच्या बरोबरच गोदाकाठी असलेल्या (एकमुखी दत्त मंदिरा शेजारील वास्तुच्या विक्री बाबतचा विषय खूपच महत्त्वाचा होता.

त्याबाबत श्री. श्रीकांत केळकर (विश्वस्त) यांनी सांगितले की, संस्थेला ८६ वर्षांचा इतिहास आहे. चांगल्या कामाची परंपरा आहे, पण नवीन युगाच्या दिशेने वाट चाल करताना काही कठीण निर्णय, संस्थेच्या हितासाठी घ्यावे लागतील. आजकाल लोकांना लग्न, कार्यांसाठी असे साधे हॉल नको असतात, जिथे पार्कींग नाही, लॉन्स नाही. सर्वांना आधुनिक, प्रशस्त कार्यालयाची अपेक्षा असते. त्यात गैर काहीच नाही. पण मग संस्थेच्या वास्तुविषयी नवा विचार करायला हवा. एक संस्कृत महाविद्यालय (गुरुकुल) संस्था आपली उमा महेश्वर लेन मधील इमारत विकत घेण्यास उत्सुक आहे. त्यासंबंधी प्राथमिक बोलणी सुरू आहेत. कायदेशीर अन्य गोष्टींची पूर्तता करून, चांगले बाजारमूल्य मिळत असेल तर ह्या बाबतीत पुढील कार्यवाही करण्यास हरकत नाही. सर्व सदस्यांनी देखील योग्य निर्णय घेण्यास संस्थेस सहकार्य करावे. या बाबत सभेस मार्गदर्शन केले.

श्री. विजय काकतकरहे देखील उपस्थित होते.

✻✻✻

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
# वर्धापन दिन व गुणगौरव समारंभाची क्षणचित्रे



ॲड. अविनाश भिडे यांचा सत्कार करताना-विश्वस्त श्री. मधुकर बापट



सत्कारार्थी प्रा. दिलीप फडके



सत्कारार्थी श्री. मोहन रानडे



सत्कारार्थी श्री. जयंत भाभे



प्रथमेश फाटक, सी.ए. गुणगौरव झाल्यानंतर मनोगत व्यक्त करतांना



श्री. जयंत भाभे- प्रतिनिधीक मनोगत व्यक्त करतांना

# श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक
# २५वी वार्षिक सर्वसाधारण सभा





डॉ. काकतकर, श्री. विजय साने, श्री. अभय खरे(सचिव), श्री. सुधीर झाले, श्री. अनिरुद्ध अभ्यंकर




श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक २५वी वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी उपस्थित सभासद




गौतमी अभय खरे व कार्तिकी उदय खरे ह्यांच्या गुणगौरव प्रसंगी प्रा. फडके, श्री.मधुकर बापट, ॲड. अविनाश भिडे आणि श्री. अभय खरे

# चित्तपावन जेष्ठ नागरिक मंच

चित्तपावन ज्येष्ठ नागरिक मंचाची सप्टेंबर २०१९ ची सभा २६ सप्टेंबर २०१९ ला संपन्न झाली. मागील महिन्यातील यशस्वी सहलीनंतर या महिन्यात एक वेगळा कार्यक्रम ठरविला होता, तो म्हणजे वृद्धत्वातील तारुण्य या विषयावर श्री. पराग घारपुरे यांच्याबरोबर गप्पा. श्री. घारपुरे नाशिक निवासी असून, त्यांनी घारपुरे अॅकेडमी स्थापन केली आहे व ते मान्यताप्राप्त प्रशिक्षक असून सध्या ज्युनिअर चेंबर इंटरनॅशनलचे विभागीय प्रशिक्षक आहेत. गप्पांची सुरुवात 'दृष्टी बदला, सृष्टी बदलेल' या वाक्याने झाली. खरं आहे, आपण जगाकडे, माणसांकडे बघायची सृष्टी बदलली तर अनेक गोष्टी सोप्या होतात, सहज होतात. वय वाढते पण ती वाढ सकारात्मक की नकारात्मक असावी हे आपण ठरवावयाचे असते. पूर्वायुष्यात आपण ज्या गोष्टी करू शकत नाही. उदा. वाचन करणे, छंदजोपासणे, त्यासाठी निवृत्तीनंतर भरपूर वेळ असतो. त्या वेळेचा उपयोग वाचनासाठी, छंदासाठी, संगीत ऐकण्यासाठी, सहलीसाठी करावा म्हणजे आपोआपच वयाची सकारात्मक वाढ होते. सकारात्मक वय वाढीतून आरोग्यही चांगले राहते. गप्पांमध्ये सौ. जयश्री साठे, श्री. मेहेंदळे व अन्य सभासदांनी भाग घेतला. सौ. साठे यांनी त्यांच्या घराच्या आसपास क्लासेससाठी येणाऱ्या तरुण/तरुणींना चांगले वळण लावण्याचा कसा प्रयत्न केला व त्याचा कसा फायदा झाला ते सांगितले. मंचाचे निमंत्रक डॉ. आपटे यांनी श्री. घारपुरेना गुलाबपुष्प देऊन त्यांचे आभार मानले.

खर तरं हा गप्पांचा कार्यक्रम ठरविला तेव्हा कुणालाच माहीत नव्हते की वृद्धत्वात तारुण्य जपणाऱ्या सभासदांच्या उत्साहाचे दर्शन घडेल व त्यांचा सत्कार करण्याचा योग याच सभेत येईल. मंचाचे दोन सभासद श्री. अरविंद वर्तक (वय ७८) व श्री. श्रीधर परांजपे (वय ७५) यांनी जळगांव येथे झालेल्या हौशी जलतरण स्पर्धेत उज्वल यश मिळविले. श्री. अरविंद वर्तक यांनी १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर फ्री स्टाईल स्पर्धेत व ५० मी. बटरफ्लाय अशी ४ सुवर्ण पदके मिळवली; तर श्री. श्रीधर परांजपे यांनी ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक व ५० मी. बॅक स्ट्रोक



डावीकडून श्रीधर परांजपे, सुमीत गोखले (श्री.आशुतोष गोखले यांचे सुपुत्र), श्री. अरविंद वर्तक

मध्ये २ सुवर्ण पदके मिळवली. या दोघांनी सकारात्मक वय वाढीचे उदाहरण प्रस्तुत केले. याशिवाय मंचाचे एक सभासद श्री. आशुतोष गोखले (नाशिक रोड) यांचे चिरंजीव श्री. सुमीत गोखले यांनी अन्य गटात १०० मीटर, २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक व ५० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये ३ सुवर्ण तर ५० मीटर फ्री स्टाईल मध्ये रौप्य पदक मिळविली. नाशिक जिल्हा हौशी जलतरण संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले व करंडक मिळविला. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी लखनौ येथे होणाऱ्या स्पर्धेकरिता श्री. वर्तक व श्री. परांजपे यांची महाराष्ट्र संघातून निवड झाली आहे. मंचाचे निमंत्रक डॉ. आपटे यांनी या तिघांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. यानंतर सभासदांनी गरम कांदा भजी व चहा-कॉफीचा आस्वाद घेतला व सभा संपन्न झाली.

ऑक्टोबर महिन्यात चौथ्या गुरुवारी, दि.२४ रोजी विधानसभेची मतमोजणी असल्याने व दिवाळीची तयारी असल्याने **सभा ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी दु. ४.३० वाजता गद्रे मंगल कार्यालय येथे होईल.** सर्व सभासदांनी सभेला उपस्थित राहून आपल्या सकारात्मक वय वाढीची प्रचिती द्यावी.

**- डॉ. कृ. भा. आपटे**
(निमंत्रक)
मो.९४०३५५६४६४

# संस्थेचे आजीव सभासद श्री. विवेक गोगटे यांच्या पत्नी सौ.मृणाल गोगटे कालवश

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, आपल्या संस्थेचे आजीव सभासद श्री. विवेक गोगटे यांच्या सुविद्य पत्नी सौ. मृणाल गोगटे यांचे दि. १८ सप्टेंबर २०१९ रोजी हृदय विकाराने दुःखद निधन झाले.



कै. डॉ. मृणाल गोगटे यांचे नाव शिक्षण क्षेत्रात आदराने घेतले जाते. त्यांनी ३५ वर्षे एच. पी. टी. कॉलेजमध्ये प्राध्यापिका या नात्याने विद्यादानाचे पवित्र कार्य केले होते व त्या ''अर्थशास्त्र'' या विषयाच्या गेली अनेक वर्षे 'विभाग प्रमुख' म्हणून कार्यरत होत्या. विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र या विषयाचे संपूर्ण आकलन व्हावे, यासाठी त्यांनी अध्यापन पद्धतीत आमूलाग्र बदल केले व विद्यार्थ्यांना हा विषय सोप्या पद्धतीने शिकवून हजारो विद्यार्थ्यांमध्ये या विषयाची गोडी निर्माण केली. केंद्रिय अर्थसंकल्पाचे पूर्णतः आकलन विद्यार्थ्यांना व्हावे यासाठी अर्थशास्त्रीय संकल्पना, आकडेवारी, तसेच अर्थसंकल्पाची पूर्व तयारी कशी केली जाते, आर्थिक सर्वेक्षण म्हणजे काय, सर्वेक्षणाची संपूर्ण प्रक्रिया, महसुली तूट , राजकोषीय तूट म्हणजे काय असते, कर संकलन, करांचे विविध प्रकार, वगैरे गोष्टी विद्यार्थ्यांना सहज समजाव्यात म्हणून डॉ.मृणाल गोगटे यांनी अथक परिश्रम घेऊन, विद्यार्थ्यांकडून च विविध चार्टस्, फ्लेक्स, बोर्डस्, ग्राफिक्स, आलेख तयार करून घेतले व ३५०० चौरस फुटांच्या भव्य दालनात त्यांचे प्रदर्शन भरवले होते. पुढे तेच प्रदर्शन अनेक कॉलेजमध्ये सुद्धा भरविण्यात आले होते. अध्यापनाच्या अभिनव प्रयोगाची दखल खुद्द पुणे विद्यापीठाने घेतली व डॉ. मृणाल गोगटे यांना ''आदर्श प्राध्यापिका'' म्हणून गौरविण्यात आले. तसेच गोखले शिक्षण संस्थेनेही त्यांना सन्मानित केले.

अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकरांच्या संकल्पनेतून 'थिंक-लाईन' या संस्थेची स्थापना झाली. ही संस्था ''अर्थशास्त्र'' या विषयाला पूर्णतः समर्पित आहे. जगात व भारतात ज्या आर्थिक घडामोडी घडत असतात त्याची माहिती लोकांपर्यंत पोहचवण्याचे मौलिक कार्य ही संस्था करत आली आहे. आपर्यंत १०३ पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. डॉ. मृणाल गोगटे यांनी अगदी स्थापनेपासूनच या कार्यात सक्रीय सहभाग नोंदवला व या पुस्तिकांचे विषय निवडले, लेखकांशी संपर्क करून त्यांना लिहिते करणे, आलेल्या लेखांचे संपादन करणे व त्यांचे प्रकाशन करणे, अशा संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली होती. थिंक-लाईन या संस्थेचा दुसरा अभिनव प्रकल्प म्हणजे पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाची 'इ-कॉम' नावाने परीक्षा घेतली जाते. डॉ. मृणाल गोगटे यांनी या कामात रस घेऊन, परीक्षेचे वेळापत्रक निश्चित करणे, प्रश्नपत्रिका काढणे, परीक्षा घेणे व उत्तरपत्रिका तपासण्यापर्यंतची सर्व कामे आनंदाने स्वीकारली. एवढ्यावरच न थांबता परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना स्व-खर्चाने त्यांनी रोख पारितोषिकेही दिली होती.

निवृत्तीनंतर त्यांचे सहा महिने वास्तव्य अमेरिकेत होते. पण तेथेही त्यांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा समग्र

अभ्यास केला होता. विद्यार्थ्यांना शिकविणे, मार्गदर्शन करणे हा त्यांचा स्थायी भाव होता. त्यामुळे त्यांनी हजारो विद्यार्थी घडविले आहेत. विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका असा त्यांचा नावैलौकिक होता.

अर्थशास्त्र ह्या विषयाचा आवाका महाकाय आहे, पण त्या विषयाचे 'तत्त्व' व 'अंतरंग' उमगलेली ज्ञान तपस्विनी आज आपल्यात नाही, यावर विश्वासच बसत नाही, पण जड अंत:करणाने वास्तव स्वीकारावे लागत आहे. त्यांच्या नसण्याने अर्थशास्त्र विभागाची अपरिमित हानी झाली आहे व ती पोकळी लवकर भरून न निघणारी आहे.

चित्तपावन ब्राह्मण संघ गोगटे परिवाराच्या दु:खात सहभागी आहेच. कै. डॉ. मृणाल गोगटे यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती लाभो हीच प्रभु परशुराम चरणी प्रार्थना.

***

**हाबळेश्वर, पांचगणी, भिलार(पुस्तकांचे गाव), कास पठार येथील पर्यटनासाठी**

घरगुती राहण्याची उत्तम सोय. २०० वर्षांचा ऐतिहासिक जुना वाडा पण सर्व अत्याधुनिक सोयींनी युक्त असा नव्या-जुन्यांचा संगम
वीक एन्ड साठी ४-८ दिवस विश्रांतीसाठी, हवाबदल म्हणून आजी-आजोबांना घरगुती वातावरणात काही दिवस राहण्यासाठी, येऊन अवश्य अनुभव घ्यावा.
तसेच वाड्यातील जुन्या दुर्मिळ (अँटिक) वस्तूंचे दालन पण पाहता येईल.

पूर्वसूचनेनुसार चहा, नाश्ता व शाकाहारी भोजनाची सोय होऊ शकेल.

**संपर्क - श्री. प्रकाश करंदीकर, वाई**
फोन : ०२१७-२२१३५८, मो.०९४२२८४७८५८

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

**मिहिर कन्स्ट्रक्शन**

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

-: **ऑफिस** :-
२, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे**, बी.ई. (सिव्हिल)
**मोबाईल : ०९४२२२४६८७८**
**ईमेल : cvranade@gmail.com**

आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय...! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...



**एक उपयुक्त दागिना...!**

अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध

अदृश्य श्रवणयंत्र

**अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

संपर्क : डॉ.श्री. व सौ.वैद्य
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरींग क्लिनीक**
फ्लॅट नं.१, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी.रोड, नाशिक
**Ph.2318333, Mob.: 9422269394**

**शाखा** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक




**कल्याणी संजय साने - 'कथक' अलंकारमध्ये विशेष प्राविण्य**
**गुणगौरव करतांना प्रा. दिलीप फडके, श्री.मधुकर बापट, ॲड . अविनाश भिडे, श्री. अभय खरे**

## चित्तपावन ब्राह्मण संघ-वर यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ४४४ | **अमोध अरूण मराठे**<br>आदित्य नगर, न्यू आर.टी.ओ.<br>ऑफिस जवळ, विजापूर रोड, सोलापूर.<br>मो.: ९७६६०२४४७४, ९३७०५३५१३१ | २६/११/१९८६ | कपि | ५'-६'' | बी. कॉम. | रु.२५,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ-वधू यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २०६ | **कु. किर्ती विनायक सहस्त्रबुध्दे**<br>६, आकृती अपार्टमेंट, सुचिता नगर, लेन नं.३<br>झेनिथ हॉस्पिटल जवळ, नाशिक-४२२००९.<br>मो.: ९४२२७२८३२२ | १७/२/१९९७ | शांडिल्य | ५'.१'' | बी.ए.<br>टुरिझम<br>APP | ७०००/- |

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा.दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक-२ येथे छापून काकागद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक - ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**फोन - चित्तपावन : २५०११०७, गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**

प्रति, ____________

## संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website: www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.